# पुणे महानगरपालिका
## आरोग्य विभाग - अन्न परवाना कार्यालय
## आरोग्य अन्न परवाना विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये खालील व्यवसायांकरीता नविन कायम / हंगामी परवाने देण्यात येतात.

| अ.क्र | फॉर्म क्र. | व्यवसायाचे प्रकार | शेरा |
|---|---|---|---|
| १ | एच - ३ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ परिशिष्ट १८ भाग ४ नुसार लॉजिंग हाऊसेस या व्यवसायाकरिता परवाना मिळणेबाबतचा अर्ज. | हंगामी/ कायम |
| २ | एच - ४ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, (१) डी (२) मंगल कार्यालय/ सभागृह लग्नमुंजी वगैरे प्रकारचे धार्मिक विधी होणारे ठिकाण या व्यवसायासाठी देण्यात येणारे परवाने. | हंगामी/ कायम |
| ३ | एच - ५ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, १ डी २, अन्वये सलून ब्युटी पार्लर या व्यवसायाकरिता परवाना मिळणेबाबत | हंगामी/ कायम |
| ४ | एच - ६ | अन्न परवाना विभाग - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, १ डी २, अन्वये पोल्ट्री कोंबडया बदके व त्यापासून पैदास होणा-या मालाची विक्री करणे या व्यवसायाकरिता परवाना मिळणेबाबत | हंगामी/ कायम |
| ५ | एच - ७ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, १ डी २, अन्वये पानपट्टी विक्री या व्यवसायाकरिता परवाना मिळणेबाबत | हंगामी/ कायम |
| ६ | एच - ८ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, १ डी २, अन्वये धान्य (फुटाणे इत्यादी ) भाजण्याच्या भट्टी या व्यवसायाकरिता परवाना मिळणेबाबत | हंगामी/ कायम |
| ७ | एच - ९ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, १ डी २, अन्वये रस गु-हाळ या व्यवसायाकरिता परवाना मिळणेबाबत | हंगामी/ कायम |
| ८ | एच - १० | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, १ डी २, अन्वये आईस फ्रुट व आईस तयार करणे या व्यवसायाकरिता परवाना मिळणेबाबत | हंगामी/ कायम |
| ९ | एच - ११ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, १ डी २, अन्वये कुत्री बाळगणे या व्यवसायाकरिता परवाना मिळणेबाबत | हंगामी/ कायम |
| १० | एच - १२ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, १ डी २, अन्वये घरगुती उपयोगाखेरीज विक्री करीता अगर इतर कोणत्याही कारणासाठी हाडे, चरबी, कातडी, (सुकी व ओली), खुर,शिंगे, कॅटगट, चामडी साठविणे या व्यवसायाकरिता परवाना मिळणेबाबत | हंगामी/ कायम |
| ११ | एच - १३ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, १ डी २, अन्वये कुत्री परवाना नुतनीकरणासाठी | हंगामी/ कायम |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | एच - १४ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, १ डी २, अन्वये मंगल कार्यालय, सलून ब्युटी पार्लर, लॉजिंग, कातडी- हाडे, आईस फ्रुट - आईस, जनावरे, गोठे करिता दिलेला परवाना नुतनीकरण. | हंगामी/ कायम |
| १३ | एच - १५ | Application for Registration/ Renewal of Registration under section ५ of the Bombay Nursing Home Registration Act, १९४९, under Rules ४ and ६ | कायम व नुतनीकरण |

## आरोग्य परवानामिळण्याबाबतची कार्यपद्धती खालील प्रमाणेः-

- नविन कायम/ हंगामी आरोग्य परवाना घेणेकरीता नागरिकाने सर्वप्रथम ज्या प्रकारचा व्यवसाय करायचा आहे त्या संबंधित फॉर्म घेणे आवश्यक आहे तो फॉर्म संपूर्ण भरुन आवश्यक त्या कागदपत्रांसह जोडून संबंधित क्षेत्रिय कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.
- क्षेत्रिय कार्यालयातील नागरी सुविधा केंद्रामार्फत (CFC) प्रकरण दाखल करतेवेळी रु. 25/- (पंचवीस) शुल्क भरणे आवश्यक आहे. सदरची पावती संबंधित अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
- संबंधित अर्ज संबंधित आरोग्य निरीक्षक / विभागीय आरोग्य निरीक्षक यांच्याकडे आल्यानंतर कागदपत्रांची पडताळणी करुन संबंधित जागेची पाहणी केली जाते.
- क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी यांच्या अवलोकनानंतर अर्जावर योग्य त्या शिफारशीसह स्वाक्षरी होते.
- क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी यांच्या स्वाक्षरीनंतर तो अर्ज अंतिम मान्यते करीता मुख्य कार्यालयाकडे मा. सहाय्यक आरोग्य अधिकारी (परवाना) व मा. आरोग्य अधिकारी यांच्या मान्यतेकरिता येवून अर्जावर योग्य त्या शिफारशीसह स्वाक्षरी होते.
- पुन्हा अर्ज क्षेत्रिय कार्यालयाकडे आल्यानंतर त्यावर LCBP / LCBT नंबर पडुन संबंधितांकडून योग्य ते शुल्क भरुन घेतले जाते.
- पुन्हा अर्ज मुख्य कार्यालयाकडे आल्यानंतर आरोग्य परवाना पुस्तक तयार करण्यात येते.
- पुस्तक तयार केल्यानंतर त्यातील नोंदी व पुस्तकातील नोंदी यांची खातरजमा प्रमुख आरोग्य निरीक्षक यांचे मार्फत करुन मा. सहाय्यक आरोग्य अधिकारी (परवाना) व मा. आरोग्य अधिकारी यांची अंतिम स्वाक्षरी होते.
- <u>हंगामी आरोग्य परवान्याबाबतः-</u>
- व्यवसायाची जागा मालकी हक्काची नसल्यास तसेच गवनि अंतर्गत असल्यास त्या व्यवसायांना ११ महिने मुदतीसाठी हंगामी परवाना देण्यात येतो.
- व्यवसायाची जागा भाडे करार तत्वावर असल्यास करारनामा दुय्यम निबंधक कार्यालयाकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.
- जागा भाडयाची असल्यास चालू महिन्याची भाडे पावती व जागा मालकाचे लेखी संमतीपत्र असणे आवश्यक आहे.
- व्यवसाय हा कंपनीमार्फत चालविण्यात येत असल्यास कंपनीचा MOU नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.
- भागिदारी स्वरुपाचा व्यवसाय असल्यास भागिदारी पत्र नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.
- व्यवसाय हा संस्थेमार्फत चालविण्यात येत असल्यास संस्थेच्या पदाधिका-यांच्या नावे परवाना दिला जातो. पदाधिकारी बदलल्यास संस्थेचा ठराव व अर्ज घेवून परवाना धारकाच्या नावात बदल करण्यात येतो.
- **<u>परवाना हस्तांतरण करतानाः-</u>**
- अ) परवाना धारक हयात असल्यास संमतीपत्र व अन्य वारसांचे प्रतिज्ञापत्र आवश्यक.
- ब) परवाना धारक हयात नसल्यास परवाना रद्द केला जातो.
- क) भागिदारांची नावे कमी जास्त करताना भागिदारी पत्र दुरुस्तीसह सादर करणे आवश्यक आहे.
- **<u>नुतनीकरणाची पद्धतः-</u>**
- वर उल्लेखित सर्व कायम / हंगामी आरोग्य परवान्यांचे व्यवसाय चालू ठेवणे असल्यास प्रति वर्षी नुतनीकरण करणे बंधनकारक आहे.